सत्यमेव जयते

# भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## 14 ऑगस्ट



सत्यमेव जयते

भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस



## माननीय प्रधानमंत्री
## श्री नरेंद्र मोदी

“फाळणीच्या वेदना कधीही विसरल्या जाणार नाहीत. आणि आपले लाखो बंधू भगिनी बेघर झाले. अनेक जणांना द्वेष आणि हिंसेमुळे जीव गमवावे लागले आपल्या नागरिकांच्या संघर्षाच्या व त्याबाच्या स्मरणासाठी 14 ऑगस्ट हा फाळणी भयानकता स्मरण दिवस म्हणून पाळला जाईल”

सत्यमेव जयते
भारत सरकार

फाळणी भयानकता
स्मरण दिवस

# पार्श्वभूमी

भारताची फाळणी म्हणजे फक्त नकाशात फेरफार करणे एवढेच नव्हते .ती एक भयानक मानवी शोकांतिका होती. माणसे आपल्याच घरात परकी झाली .शेजार निर्जन झाले ,आणि शेकडो वर्षांचे सहजीवन एका क्षणात छिन्नभिन्न झाले.सुमारे सहा दशलक्ष बिगर मुस्लिमांना एक प्रदेश सोडण्यास भाग पाडण्यात आले. तोच भाग पश्चिम पाकिस्तान बनला. तशाच प्रकारची घटना भारताच्या पूर्वेकडे घडली ,आणि सुमारे दोन दशलक्ष बिगर मुस्लिमांनी पश्चिम बंगालमध्ये आश्रय घेतला. यामध्ये सुमारे अर्धा ते एक दशलक्ष लोकांचा मृत्यू झाला. इथे प्रदर्शित केलेली छायाचित्रे, पत्रे, नकाशे व वस्तू एकेकाळी एकत्र असलेल्या जीवनाची साक्षीदार आहेत. ते अचानक आणि हिंसक पद्धतीने अलग करण्यात आले.

सुमारे साडेसहा दशलक्ष मुस्लिमांनी पंजाब आणि दिल्ली भागातून पाकिस्तानात देशांतर केले. सुमारे दोन दशलक्ष मुस्लिम मुस्लिमांनी पूर्व बंगालमध्ये( सध्याचा बांगलादेश) मध्ये देशांतर केले, आणि 1950 पर्यंत आणखी दोन दशलक्ष लोकांनी पश्चिम बंगाल मध्ये आश्रय घेतला. याच काळात सुमारे एक दशलक्ष मुस्लिम मुस्लिमांनी पश्चिम बंगाल सोडला. यामध्ये अर्धा ते एक दशलक्ष माणसांचा मृत्यू झाला .

सत्यमेव जयते

भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

## माउंटबॅटन योजनाः एका राष्ट्राच्या विभाजनाची घोषणा




नवी दिल्ली येथे झालेल्या पत्रकार परिषदेत फाळणी योजनेचे अनावरण करण्यात आले.
डावीकडून उजवीकडे पाहिले - जवाहरलाल नेहरू, लॉर्ड इस्मे (माउंटबॅटनचे सल्लागार),
व्हाइसरॉय लॉर्ड लुईस माउंटबॅटन आणि मुहम्मद अली जिना.

## फाळणीची ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारताचे शेवटचे व्हाईसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन यांनी एक ऐतिहासिक पत्रकार परिषद घेतली .ही ब्रिटिश इंडियाच्या काळातली फक्त दुसरी आणि अखेरची अशी पत्रकार परिषद होती, जिच्यामध्ये स्वतः व्हाईसरॉय यांनी पत्रकारांसमोर भाषण केले .सुमारे 300 पत्रकार तिथे आले होते .अमेरिका ,रशिया, चीन ,युरोप आणि भारताच्या प्रत्येक कोपऱ्यातून ते आले होते . माऊंटबॅटन यांची घोषणा एकाग्रपणे हे पत्रकार ऐकत होते. त्या घोषणेला माउंटबॅटन प्लॅन (भारताचे स्वातंत्र्य आणि त्याची फाळणी याची घोषणा) म्हणून जाते. त्यांनी 15 ऑगस्ट ही तारीख सत्तांतरासाठी निश्चित केली. त्यांनी फाळणीची रूपरेषा पुढे मांडली. त्यात पंजाब व बंगाल यांचे विभाजन यांचा समावेश होता. उपस्थित पत्रकारांनी त्यांना टोकदार प्रश्न विचारले. त्यांच्यापैकी महत्त्वाचा प्रश्न म्हणजे 'या विभाजनामध्ये ज्यांना देशांतर करण्यास भाग पाडण्यात येईल, त्यांचे काय होणार ?

सत्यमेव जयते

भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

## "ते स्वतःला स्थानांतरित करतील": निर्मितीतील एक शोकांतिका



LARGEST NET SALES of any Daily Newspaper Printed in Northern, Southern, Central or Western India.

REGD. No. B111

For CARPETS and FURS visit ASIATIC FUR & CARPET STORE

# The Times of India

ESTABLISHED 1838

NO. 132. VOL. CIX. BOMBAY: WEDNESDAY, JUNE 4, 1947 PRICE TWO ANNAS DO NOT PAY MORE

8 CLOSER SHAVES PER BLADE SAHARA EXTRA

# WAY OUT OF INDIAN DEADLOCK

## BRITAIN'S PLAN FOR SMOOTH TRANSFER OF POWER

### Immediate Dominion Status Granted

### PEOPLE ASKED TO DECIDE PARTITION QUESTION

### Present Constituent Assembly Not Disturbed

*THE BRITISH GOVERNMENT HAVE PROMISED IMMEDIATE DOMINION STATUS TO INDIA—THIS YEAR—, AND THEIR PLAN BY WHICH THEY WILL END THEIR 200 YEARS OF RULE PUTS FULL RESPONSIBILITY FOR THE FUTURE OF INDEPENDENT INDIA DIRECTLY ON THE SHOULDERS OF THE INDIAN PEOPLE, LEAVING THEM THE CHOICE OF PARTITION OR OF MAKING UP THEIR DIFFERENCES FOR UNITY'S SAKE.*

*Two-Fold Purpose*

*The two-fold purpose of the plan, which was announced simultaneously to the Indian people and in both Houses of Parliament on Tuesday, is (1) to make possible the maximum degree of harmony and co-operation among the Indian*

*MR. CHURCHILL'S SUPPORT*

*Speedy Legislation*

Mr. Winston Churchill sprang a surprise on Tuesday when, speaking in the House of Commons after Mr. Attle had made the statement on India, he promised support to the legislation necessary to give parts of India full Dominion Status.

"It should not be right," he declared, "that such legislation should be deemed contentious or that any long delay should elapse after it is introduced and before it is passed into law."

(See Page 5)

Lord Mountbatten.

### "UNIFIED INDIA BEST SOLUTION"

### Viceroy's Appeal

### "THERE IS INDIAN CONSCIOUSNESS"

NEW DELHI, June 3.

The Viceroy, broadcasting tonight announced that His Majesty's Government had accepted his proposal that they should transfer power to one or two Governments of British India, each

### *Only Practical Method*

### PREMIER'S VIEW

### *Plan Commended To Commons*

LONDON, June 3.

The Prime Minister, Mr. Attlee, announced in the House of Commons today that the British offer of Dominion Status to one or two successor Indian authorities had been favourably received by all the three parties represented at the conferences held by the Viceroy with the Indian leaders during the past few days.

The announcement was received with loud cheers.

Mr. Attlee who was announcing the Government's plan for transfer of power to Indians said that the British Government wished to make it clear that they have no intention of attempting to frame the ultimate constitution for India. This was a matter for Indians

## MR. NEHRU COMMENDS PLAN TO NATION

### Mr. Jinnah Hopeful Of League's Acceptance

### SARDAR BALDEV SINGH CALLS IT "SETTLEMENT"

NEW DELHI, June 3.

BROADCASTING to the nation immediately after the announcement of the British Government's plan, Pandit Jawaharla Nehru said: "It is with no joy in my heart that I commen these proposals to you, though I have no doubt that this is th right course.

"The proposal to allow certain parts to secede, if they so will, is painful for any of us to contemplate. Nevertheless I am convinced that our present decision is the right one even from the larger viewpoint."

Mr. Jinnah, who followed Pandit Nehru, said the League' final decision could only be taken by the League Council on Jun 9, but so far as he could gather, "on the whole, the reaction i League circles in Delhi has been hopeful."

Sardar Baldev Singh, who also spoke, commended the plan as the best under the circumstances.

Pandit Nehru in his broadcast said: "Nearly nine months ago, soon after my assumption of office, I spoke to you from this place. I told you then that we were on the march and the goal had still to be reached. There

meet my people and to learn abo their troubles at first hand.

"Today I am speaking to you another historic occasion when vital change affecting the future India is proposed. You have ju heard an announcement on behalf the British Government. This a nouncement lays down a procedu for self-determination in certa areas of India. It envisages on th

जून 1947: वर्तमानपत्रात फाळणीची घोषणा.

फाळणीमुळे होडाऱ्या सामूहिक देशांतराच्या शक्यतेबद्दल विचारल्यावर माउंटबॅटन यांनी जे उत्तर दिले, ते इतिहासाला भुतासारखे पछाडणारे आहे .ते म्हणाले होते 'व्यक्तिगतरीत्या मला तसे काही दिसत नाही. लोकांचे देशांतर म्हणाल तर काही लोक स्वाभाविकपणेच देशांतर करतील.'

– द ट्रिब्यून, ५ जून १९४७

सत्यमेव जयते

भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

## डेरावल हिंदूंच्या प्रवासाची आठवण

आता मागे वळून पाहताना माउंटबॅटन यांचे हे विधान अतिशय दुःखदायक आणि भाबडे वाटते ,कारण त्यांच्या दृष्टीने ते 'छोटेसे देशांतर' हे जगातील सर्वात मोठे आणि हिंसक असे देशांतर बनले .सुमारे 13 दशलक्ष लोक आपल्या देशातून, आपल्या घरातून, आपल्या भूतकाळातून उखडले गेले. यात डेरावाला लोक होते. डेरावाला हे डेरा इस्माईल खान मधील हिंदू समाजाचे लोक होते, व ते सिंधू नदी जवळ राहत होते




प्रार्थना

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे
त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोऽहम्
महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे
पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ॥१॥

प्रभो शक्तिमन् हिन्दुराष्ट्राङ्गभूता
इमे सादरं त्वाम् नमामो वयम्
त्वदीयाय कार्याय बद्धा कटीयम्
शुभामाशिषं देहि तत्पूर्तये ।





हे प्रदर्शन त्यांची न सांगितलेली न ऐकलेली गोष्ट जिवंत करीत आहे .यातील प्रत्येक छायाचित्र आणि वस्तू ही डेरावाला हिंदूंची स्मृती आहे. कशाप्रकारे स्मृती, विश्वास आणि तगून राहण्याची इच्छा अगदी अनिश्चित भविष्य असतानाही टिकून राहिली आहे हे यातून दिसते.

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## अनिश्चित काळात आश्रय शोधणे



बऱ्याच डेरावाल्यांसाठी फाळणी ही काही फक्त कॅलेंडर मधली एक तारीख नव्हती, तर त्यांचे सर्वस्व मागे ठेवून जाण्याचा तो दिवस होता. अनेक कुटुंबांनी आपण काही महिन्यांनी परत येऊ या विश्वासाने आपली घरे सोडली. डेरा इस्माईल खान मधील रहिवाशांनी स्टीमर द्वारे सिंधू नदी पार केली ,आणि दर्या खान ते लाहोर ही ट्रेन पकडली. तिथून त्यांनी अमृतसर, जैसलमेर आणि जयपूर अशा शहरांची वाट धरली .नंतरच्या काही वर्षांत भारत सरकारने त्यांना जमीन, घरे आणि दुकाने वाटप करणे सुरू केले. या कुटुंबांनी हळूहळू देशाच्या विविध भागांत आपली जीवने पुन्हा उभारण्यास सुरुवात केली.

सत्यमेव जयते

भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

## फाळणी आणि महिलांचे मूक संघर्ष







हे फोटो 1947 च्या फाळणीत डेरा इस्माईल खान मधून आलेल्या कुटुंबाचे छायाचित्र आहे .त्याच्यामध्ये स्व श्री हिरानंद भाटिया यांची बहीण म्हणजे मुन्नी देवी आहेत . त्या बालविथवा होत्या आणि हा लांबचा प्रवास त्यांनी केला तेव्हा त्यांचे वय 37 वर्षे होते फाळणीत लाखो लोकांना त्रास झाला पण महिलांसाठी ही शोकांतिका अधिक भयावह होती त्यांच्या समाजातील स्थानामुळे त्यांचा संघर्ष अधिक अवघड बनला आणि बऱ्याच महिलांसाठी त्या क्रूर स्मृती खोल जखमांसारख्या राहिलेल्या आहेत .

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

## चांदी आणि सोनेः स्मृती आणि जीवनरेषा म्हणून दागिने



फाळणीच्या काळात व्यक्तिगत वापरातील वस्तू या सोन्याच्या व चांदीच्या होत्या. कुंकवाचे करंडे ,भांडी, दागिने यांचा उपयोग त्यांना प्रवासाच्या काळात जंगम संपत्तीप्रमाणे झाला .
या गोष्टी बरोबर घेतल्यामुळे त्या कुटुंबांना अनिश्चिततेच्या व विस्थापनाच्या काळात आर्थिक बळ मिळवण्यासाठी मदत झाली.

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## चांदी आणि सोनेः स्मृती आणि जीवनरेषा म्हणून दागिने





या फोटोत नक्षीकाम असलेला एक चांदीचा आरसा आणि मनगटातील दागिना दिसत आहे .तो डेरावाल भारतीय कुटुंबाचा आहे.

मनगटातील दागिना हा तत्कालीन एक आण्याच्या नाण्यापासून तयार केला गेला आहे. त्या नाण्यांवर इंग्लंडची राणी विक्टोरिया हिची प्रतिमा कोरलेली आहे.

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## चांदी आणि सोनेः स्मृती आणि जीवनरेषा म्हणून दागिने





सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## मागे राहिलेल्या मातृभूमीची भाषा आणि वारसा






श्रीमती तुतेजा यांच्या हातात भगवद्गीतेची उर्दू आवृत्ती आहे .फाळणीच्या काळात ती त्यांनी बरोबर आणली होती. डेरा इस्माईल खान मध्ये डेरावाले हे उर्दूतून भगवद्गीता वाचत असत. स्थानिक भाषिक परंपरांशी आपल्या धार्मिक प्रथेचे त्यांनी मिश्रण केले होते .एकेकाळी पूजेसाठी असलेली ही वस्तू आता स्मृतीतील एक गोष्ट म्हणून राहिली आहे.

सत्यमेव जयते

भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## भागवत पुराण ज्याने प्रवास केला सीमा ओलांडून श्रद्धा


श्रीराधाकृष्ण ।

श्रीराधिकाजी का भगवान् की वंशी लेकर बजाना ।

मङ्गलाचरण

उल्थाश्रीमद्भागवत बीचबोली उर्दू के पहिले श्रीगणेशजीके
गोंकोयाद व ध्यानकरताहूं जिनकेध्यानकरनेसे सबकामना
दमीकी पूरीहोतीहैं फिरआदि निराकारज्योति परब्रह्म परमे
रको दण्डवत्करताहूं जिनकीमायासे सबजड़ व चैतन्यकी
पत्ति व पालन व नाशतीनोंलोकमें होताहै व सबजीवोंमेंब्रह्मा
लेकर चींउटीतक उन्हींके तेजका प्रकाशरहताहै सबसे पहिले
थे व महाप्रलय होनेपरभी वहीअविनाशीपुरुष स्थिररहैंगे व
कृष्णाजी महाराजसांवलीसूरत मोहनीमूरतपर न्यवछावरहो
उनकेपैरोंपरशिरधरताहूं जिन्होंने अपनीइच्छासे वास्तेभार
रने पृथ्वी व मारनेकंस व जरासन्ध आदिक अधर्मी राजा व
क्षस जो हरिभक्तोंको दुःखदेतेथे व दर्शनदेकर कृतार्थकरने अप
भक्त व सेवक वसदेव व देवकीकेयहां मथरानगरी में सगरात्र


ऋधि-सिधि-दायक सुख-सदन, गौरी-सुवन गनेश, विघन-हरन मंगल-करन, काटहिं सकल कलेश ।

श्रीमद्भागवत के बारहों स्कन्ध का

हिंदी-अनुवाद

जिसको

श्रीकाशीवासी बाबू मक्खनलाल पंजाबी खत्री ने पण्डित जोखूराम और

जगन्नाथप्रसाद की सहायता से

हिंदी-भाषा में अनुवाद किया

श्रीकृष्णानुरागी महात्माओं और भारतवर्षीय सज्जनों के अनुरागार्थ

लखनऊ

विपिनबिहारी कपूर सुपरिंटेंडेंट द्वारा, नवलकिशोर-प्रेस में मुद्रित और प्रकाशित ।

सर्वाधिकार रक्षित ।

मूल्य १२) ] [ सन् १६४४ ई०

भागवत पुराणाची ही १९४४ ची हिंदी आवृत्ती लखनौमध्ये प्रकाशित झाली होती आणि डेरा इस्माईल खानमधील एका वधूला तिच्या लग्नाच्या वेळी भेट म्हणून देण्यात आली होती.

फाळणीनंतर, हे पुस्तक कुटुंबासह जयपूरला गेले आणि अनेक वर्षे त्यांच्या दैनंदिन प्रार्थनेचा भाग राहिले. त्यांच्या धार्मिक परंपरा जपण्याचा दृढनिश्चय करून, डेरा इस्माईल खान सोडल्यानंतर कुटुंबाने ते त्यांच्यासोबत आणले.

घरातील महिला प्रमुख दररोज ते पठण करत असे. तिच्या मृत्यूनंतर, हे पवित्र पुस्तक तिच्या नातवाला देण्यात आले, जी आजही तिला वडिलोपार्जित भूमी, श्रद्धा आणि पिढ्यानपिढ्या स्मृतींशी जोडणारा जिवंत धागा म्हणून जपते.

सत्यमेव जयते
भारत सरकार

## फाळणी भयानकता
## स्मरण दिवस

# सिंधू नदीची रामलीला





डावीकडच्या जुन्या फोटोत राम आणि सीता यांच्या वेशात असलेली मुले दिसत आहेत. ती डेरा इस्माईल खान मधील आहेत. डेरावल हिंदू समाजासाठी दसरा व बैसाखी हे सर्वात महत्त्वाचे सण असत .दसरा नऊ दिवसांचा असे नऊ दिवस रामलीलेचा प्रयोग होत असे, आणि विजयादशमीच्या दिवशी सिंधूकिनारी रावण प्रतिमेचे दहन केले जाई.

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

## रक्तस्त्राव सीमांमागील माणूस: सिरिल रॅडक्लिफ



(seated, centred) Sir Cyril Radcliffe, a prominent British barrister, was assigned the crucial task of drawing the borders between India and Pakistan.

नवीन तयार झालेल्या देशांना भेट दिली तर दोन्ही कडील लोक आपल्याला मारून टाकतील असे ज्याला वाटत होते, तो माणूस म्हणजे सर सिरील रॅडक्लिफ.भारतात त्यापूर्वी कधीही न आलेल्या या गृहस्थाला इंग्रजांनी 40 दिवसांत भारत आणि पाकिस्तान यांच्यामधील सीमा निश्चित करण्याचे काम दिले होते.

त्याने कधीही भारतातील खेडी पाहिली नव्हती ,इथल्या नद्या पाहिल्या नव्हत्या, अरण्ये पाहिली नव्हती, त्यांचा अभ्यास केला नव्हता. शेती आणि उद्योग यांचा संबंध त्याला ठाऊक नव्हता आणि तरीही त्याने सीमा ठरवल्या. बंगालमध्ये फाळणी ही आर्थिक निकषावर न करता धार्मिक निकषावर केली गेली.

पण सर्वात जास्त फटका पंजाब ला पोहोचला. एका रात्रीत मोठ्या संख्येत हिंदू, मुस्लिम आणि सिख हे अल्पसंख्यांक झाले .त्यातून मोठ्या आणि भयानक दंगली झाल्या .अनेक हत्या झाल्या, विस्थापने झाली .सीमा आखल्या जात होत्या, पण नंतर होणाऱ्या स्थलांतरासाठी कुठलीही योजना नव्हती. रेडक्लिफ नंतर कधीही भारतात परतला नाही.

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## कलकत्त्यात सैतानाचा नाच:


SUNDAY, Hindusthan Standard AUGUST 25, 1946.

DEVIL'S DANCE IN CALCUTTA






रेडक्लिफने आखलेल्या सीमांचा परिणाम सर्वात अधिक पंजाब आणि बंगालवर झाला. शतकानुशतके जे समाज एकमेकांशी सलोख्याने राहत होते त्यांच्यामध्ये फूट पडली आणि हे सारे ब्रिटिश यांच्या तुरा आणि राज्य करा या धोरणाचा भाग होता त्यांनी विविध समाजातील सांस्कृतिक आणि धार्मिक फरकांना भडकवले आणि स्वतःची पकड घट्ट केली

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

## दुष्काळ आणि आगः सुहरावर्दीचा बंगाल



हुसेन शहीद सुहरावर्दी

1946 मध्ये कोलकात्या ला झालेल्या धार्मिक दंगलीत तेल ओतण्याचे काम स्थानिक आणि प्रादेशिक नेत्यांनी केले. त्यांच्यापैकी मुस्लिम लीगचे मुख्यमंत्री एच एस सुर्हावर्दी हे सर्वात अधिक जबाबदार होते. कलकत्त्यात चिथावणीखोर भाषणे देऊन त्यांनी जमावाला हिंदूंच्या विरुद्ध भडकावले. सुर्हावर्दीचे राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे एकदा सत्तेत आल्यावर ती कुठल्याही परिस्थितीत सोडायची नाही. आपले सत्तेतील स्थान पक्के करण्यासाठी त्यांनी सार्वजनिक निधीचा वापर केला ,आणि त्यातून आपल्या विरोधकांना गप्प करण्यासाठी गुंडांची खाजगी सेना तयार केली .1942 च्या बंगालच्या दुष्काळात उपासमार होत असलेल्या जनतेला धान्य न पुरवतात त्यांनी साठेबाजी केली आणि त्या धान्याचा काळाबाजार करून कोट्यवधी रुपये कमावले .

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## फाळणीपूर्वीचा कोलकात्यातील सर्वात काळा काळ




16 ऑगस्ट 1946 रोजी मुस्लिम लीगने डायरेक्ट ॲक्शन डे जाहीर केला. डायरेक्ट ॲक्शन म्हणजे  गरज पडली तर भारतीय मुस्लिम हे डायरेक्ट अ‍ॅक्शन घेऊन पाकिस्तान मिळवू शकतात. या सर्वाचा कलकत्त्यातील सूत्रधार म्हणजे सुर्हावर्दी हा होता .त्याच्या भडकाऊ वक्तव्याने पेटून उठलेल्या मुसलमानांचे जमाव कलकत्त्याच्या रस्त्यांवर 16 ऑगस्ट रोजी उतरले. ते धार्मिक घोषणा देत होते आणि त्यांच्या हातात लाठ्या, लोखंडी गज, कोयते अशी हत्यारे होती. वातावरण इतके भीतीदायक होते की भीतीने घाबरलेले पोलीस हिंसा चालू असताना तिथून अदृश्य झाले.

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## ज्या दिवशी एक राज्य कोसळले


MONDAY STATESMAN, AUGUST 19, 1946

The Statesman.

(With which the FRIEND OF INDIA is incorporated.)
PUBLISHED SIMULTANEOUSLY FROM CALCUTTA AND DELHI.

...II. No. 22806 REG. No. C193 CALCUTTA, MONDAY, AUGUST 19, 1946. TWO ANNAS.

...VER 270 KILLED, 1,600 INJURED IN TWO DAYS

...Riots

ROCKET BURSTS OVER SWEDISH TOWN

STOCKHOLM, Aug 16.—Window panes were broken in Malmo when a rocket projectile exploded over that town today. The authorities are searching for fragments of the projectile which was reported to have been seen falling to the ground.—Reuter.

SOEKARNO TO GIVE UP "DICTATORSHIP"

REQUEST TO SHARIAR TO FORM CABINET

BATAVIA, Aug 16.—The Indonesian President, Dr Soekarno, is expected in Indonesian Republican circles to give up his "dictatorial" powers to a new Cabinet which he has asked Dr Shariar, former Premier, to form, the Netherlands News Agency said today. Dr Soekarno assumed full powers July after Dr Shariar and other ... Ministers had been kidnapped

The yacht Grille, presented to Hitler by the German nation and now in British possession, is to be sold by the Admiralty. It was from the yacht, now lying at West Hartlepool, that Adm Doenitz announced Hitler's death.

Latest Treaty Proposals

QUALITY
There is TRUTH in our Quality
MODERN FURNISHERS
CALCUTTA.

...OWER PLANT
...RT BROTHERS

"GILDA" GLENN FORD George MACREADY ... Joseph CALLEIA

EKCO —The Flawless RADIO—

GREEK MONARCHY


# CALCUTTA DEATH ROLL 200, WITH 1,500 INJURED

## Crowds Fired on Today: Planes over Riot City

**ARSON and death have swept Calcutta and today, second in the Moslem campaign of 'direct action,' the jittery city heard New Delhi Radio report that so far at least 200 persons have been killed and 1,500 injured. The city fire brigades have had more than 40 calls to outbreaks.**

In the city's hospitals, choked with victims, surgeons and nurses worked all night at the task of catching up with the arrears of injured, some of them desperately hurt, who were brought in cars or on the shoulders of their friends.

Today the bodies of people killed with knives, sticks and other weapons were still being collected from some streets.

Normal city life was practical at a standstill, and there were no milk or newspaper deliveries today

**A strong force of police, who yesterday used tear gas on the crowds, opened fire on several occasions again today to disperse crowds. R...**

...ing lathis — bamboo staves. The city was without public transport, both tram and bus services having stopped.

The British independence plan for India does not concede the Moslem League demand for Pakistan—a separate Moslem state.

Pandit Nehru, Congress Party president, met the Viceroy, Lord Wavell, today.

**Jinnah Condemns**

Pandit Nehru said today, "Our programme for forming ...

"Hello twins!" two young holdaymakers enjoying yesterday's fine weather.

## Britain to End Leopard Men Killings

Lagos, Nigeria, Saturday.—Britain is making a big drive to stamp out the "leopard men", an African secret society that specialises in killing in the manner of leopards.

The "leopard men" generally will kill anybody for 100 manillas (8s 4d and a goat for sacrifice before the deed is committed.

Part of the equipment of the "leopard man" is a carved wooden snake which is placed in the victim's path in the lonely bush to bring him to a halt.

The victim is then skewered through the neck and scratched with a pronged instrument used to imitate the claws of a leopard.—Reuter.

*Food Minister Says—*

## Bread Saving Came at Right Time

सत्यमेव जयते
भारत सरकार

## फाळणी भयानकता
## स्मरण दिवस

# रक्ताने माखलेले शहर

## Riot Ultimatum: "Join Islam Or Burn"

CALCUTTA, Oct. 20. A.A.P.— Principal motives behind the lawlessness in the Noakhali district of eastern Bengal were mass conversions to the Islamic faith and the abduction of women, according to a staff correspondent of the conservative newspaper "The Statesman."

"All villages in this area have accepted Islam," said a Hindu correspondent in Noakhali, in a letter released by the Bengal Press Advisory Committee. "A huge mob gave us the ultimatum to join Islam or be burnt."

Villages had been attacked, houses burned, and some women carried off, according to evacuees who have arrived in Calcutta from the Noakhali area. About 1000 more evacuees have arrived.

"The Statesman" says about 150,000 persons and 400 villages are affected by the mob violence. It quotes a staff correspondent as saying that 10,000 persons had left the interior and were sheltering at Chandpur.

A correspondent of the Moslem "Morning News" reports that stories of mass conversion and the abduction of women were entirely untrue and were only intended to excite communal passions and oust Bengal's Moslem League Ministry.

IN BRIEF

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

## दोन मानवी दुर्घटनांचा साक्षीदार



1946 मध्य कोलकात्यात मोठ्या प्रमाणावर धार्मिक दंगली झाल्या .सुमारे 5000 लोक या हिंसाचारात मरण पावले. अमेरिकन फोटोग्राफर व पत्रकार मागरिट  बुर्के व्हाइट यांनी आधी जर्मन छळ छावणीला भेट दिली होती. कोलकात्यातील दृश्य पाहून म्हणाल्या कलकत्ता अगदी बुचेनवाल्ड सारखे दिसत होते.

बुचेनवाल्ड हा जर्मनीतील सर्वात मोठी आणि कुप्रसिद्ध अशी छळ छावणी होती.

सत्यमेव जयते
भारत सरकार

फाळणी भयानकता
स्मरण दिवस

# नोआखली नरसंहार आणि गांधींची मार्च फॉर हार्मोनी





कोलकात्यातील हिंदूंच्या विरुद्ध सुरू झालेले दंगे लवकरच बंगालच्या इतर भागातही पसरले. काही महिन्यातच नोवाखालीत हिंसा सुरू झाली .

या हिंसेने महात्मा गांधी सुद्धा हादरले .ते तत्काळ पूर्व बंगाल मध्ये गेले आणि अनवाणी चालत सुमारे चार महिन्यांत त्यांनी अनेक खेड्यांना भेटी दिल्या. त्यांनी तिथे अहिंसेचा आणि सामाजिक सलोख्याचा संदेश दिला.

सत्यमेव जयते
भारत सरकार

## फाळणी भयानकता
## स्मरण दिवस

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी
# आणि त्यांचे न विसरलेले प्रयत्न



धार्मिक दंगे शमविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल बोलताना नोवाखाली बद्दलच इतिहासाच्या पुस्तकांत अधिक लिहिलेले आढळते आणि महात्मा गांधींच्या भूमिकेची अधिक चर्चा झालेली दिसते. पण बंगाल जळत असताना शांतपणे काम करणारे काही धीरोदात्त लोक होते. ते प्रसिद्धीपासून दूर राहून हिंसा शमवण्याचे काम करीत होते. आणि तरीही आपल्याला त्यांच्याबद्दल फार कमी माहिती आहे .डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी हे त्यांच्यापैकी एक होते. त्यांनी बंगालच्या इतिहासाला आणखी भयानक वळण घेण्यापासून वाचवले .आणि तरीही आपल्याला त्यांच्या खऱ्या योगदानाबद्दल फार कमी माहिती आहे

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## नवीन राजकीय दृष्टिकोनाचे संस्थापक विचारवंत



- डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी हे एक वकील शिक्षण तज्ञ आणि राजकीय नेते होते .
- स्वतंत्र भारताच्या पहिल्या सरकारमध्ये ते एक कॅबिनेट मंत्री होते.
- अगदी तरुण वयाचे असताना ते कोलकाता विद्यापीठाचे उप कुलगुरू झाले.तेव्हा त्यांचे वय फक्त तेहतीस वर्षांचे होते .या पदावरती चार वर्षे होते.
- 1951 मध्ये त्यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली त्याचेच आजचे रूप म्हणजे भारतीय जनता पक्ष (बी.जे पी. ).

सत्यमेव जयते
भारत सरकार

## फाळणी भयानकता
## स्मरण दिवस

# बंगालची फाळणी आणि डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची भूमिका




बंगालची फाळणी आणि डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांची भूमिका:

- श्यामाप्रसाद मुखर्जींच्या अथक प्रयत्नामुळेच बंगाल भारतामध्ये राहिला .त्यांच्या प्रयत्नामुळेच भारताचा अविभाज्य भाग म्हणून पश्चिम बंगाल हे राज्य निर्माण झाले आणि कोलकाता ही त्याची राजधानी राहिली.
- संपूर्ण बंगालचा समावेश पाकिस्तानात करण्याच्या कल्पनेला डॉक्टर मुखर्जी यांनी प्रखर विरोध केला आणि बंगाली हिंदूंसाठी वेगळे राज्य तयार करण्याच्या कल्पनेचा पुरस्कार केला

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## पश्चिम बंगालचे शिल्पकार



त्यांना योग्य त्या केलेल्या बंगालच्या पुरस्कारामुळे त्यांना जनतेमधून मोठा पाठिंबा मिळाला. त्यांनी जनमत जागृत केले आणि विद्वानांचा पाठिंबा मिळवला.

श्यामाप्रसाद मुखर्जी व्हाईसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन यांना भेटले आणि आपली आर.सी. मजुमदार, जदुनाथ सरकार ,राधाकुमुद मुखर्जी, मेघनाद साहा ,पी .आर .ठाकूर आणि जी. डी .बिर्ला यांच्यासहित समाजातील विविध वर्गातील नामवंतांचा सल्ला घेऊन पश्चिम बंगाल राज्य तयार करण्यासाठी जनमत तयार केले.

पश्चिम बंगालची निर्मिती हे डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे एक सर्वात मोठे यश होते

सत्यमेव जयते
भारत सरकार

फाळणी भयानकता
स्मरण दिवस

# मुखर्जी यांचे पत्र आणि पश्चिम बंगालची निर्मिती



23 एप्रिल रोजी 1947 रोजी श्यामाप्रसाद मुखर्जींनी बंगालबद्दल लॉर्ड माऊंटबॅटन यांच्याशी तपशीलवार चर्चा केली. दोन मे 1947 रोजी मुखर्जींनी लॉर्ड माऊंटबॅटन यांना एक प्रदीर्घ पत्र लिहिले .20 जून 1947 रोजी पश्चिम बंगाल हे राज्य निर्माण करण्याच्या निर्णयाला अंतिम स्वरूप देण्यात आले. डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे बंगालमधील हिंसेच्या काळातील मदतीचे प्रयत्न : 16 ऑगस्ट 1946 रोजी मुस्लिम मुलींच्या डायरेक्ट ऍक्शन च्या दिवशी चार दिवस पूर्वनियोजित हिंसा सुरु झाली . एच एस सुर्हावर्दीवरती यांच्या सरकारने या काळात सुट्टी जाहीर केली होती .त्यामुळे जमावांना लुटमार करणे, आगी लावणे आणि खून खराबा करणे शक्य झाले. ब्रिटिश पत्रकारांनी या प्रकाराला अनियंत्रित हिंसा असे नाव दिले.

भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

## बंगालमध्ये थेट कृती दिनाच्या हिंसाचाराच्या वेळी मदत कार्यात डॉ. मुखर्जी यांचे नेतृत्व



Amrita Bazar Patrika

78th YEAR OF PUBLICATION

# CALCUTTA UNDER MOB RULE

## 161 Persons Killed And Over 800 Injured

### CURFEW PROCLAIMED

### Orgy Of Looting, Rioting, Stabbing & Incendiarism

LEAGUE'S 'DIRECT ACTION' DAY SEQUEL

Calcutta was handed over to unchecked mob rule yesterday — 16th of August, the direct action day as announced by the Muslim League.

There was widespread looting, rioting, stabbing and incendiarism all over the city. The police were conspicuous by their absence from most of the places. Wherever they appeared after frantic calls for protection they hardly interfered with rioters.

Over 800 persons were removed to different hospitals of the city with injuries. The number of death upto 1-30 a.m. was given as 161. This does not give the correct figures of dead and injured for many persons dead or dying were found lying in the street unattended towards the nightfall.

Troops have been moved into the city and stationed in police headquarters. Curfew has been ordered in the city from 9 p.m. to 4 a.m. (Bengal Time).

Mr. H. S. Suhrawardy, Chief Minister of Bengal, interviewed by A. P. I. late last night said that the situation was improving.

No incidents were reported from anywhere else in India.

JINNAH DECLINES NEHRU'S OFFER

Congress To Go Ahead With Formation Of Interim Govt.

India's Freedom In No Time

People Reminded Of India Ahead

ALLIED DESIGN IN ITALY AND GREECE

Molotov's Charges Denied By Mr. Alexander

Vision Of Ideal State

Gandhiji's Reply To Questions

BANK STRIKE TO-DAY

Mass Meeting Postponed

BRITISH DESIGN IN INDIA

Denial By Foreign Office

CABINET MISSION IN INDIA.

डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे मदत कार्यातील प्रयत्न :

- सरकार कोसळले असतानाही डॉक्टर मुखर्जी मागे हटले नाहीत.
- त्यांनी मदत कार्यांचा आरंभ केला.
- त्यांनी नॅशनल हिंदू गार्डची स्थापना केली.
- त्यांनी दंगलीमुळे नुकसान झालेल्या भागांना स्वतःभेटी दिल्या आणि नागरिकांसाठी सुरक्षा व्यवस्था संघटित केली.

सत्यमेव जयते
भारत सरकार

## फाळणी भयानकता
## स्मरण दिवस

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे प्रत्यक्ष कृती दिनाविरुद्ध ऐतिहासिक भाषण

डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे डायरेक्ट ॲक्शन डे च्या विरोधातील ऐतिहासिक भाषण

दिनांक 20 सप्टेंबर 1946 रोजी बंगालच्या विधानसभेत मुस्लिम लीग विरोधात अविश्वास ठरावाला पाठिंबा देणारी प्रभावी भाषण श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी कोलकात्यातील दंगलीसाठी सुर्हावर्दी यांना थेट जबाबदार धरले. ते म्हणाले ,'जे काही घडले तो काही अचानक झालेला विस्फोटक प्रकार नव्हता, तर ते प्रशासनाच्या अकार्यक्षम ,भ्रष्ट आणि जातीयतावादी गोष्टींचा परिणाम होता .तात्कालीक कारण म्हणजे मुस्लिम लीग च्या मुंबई येथे झालेल्या अधिवेशनातील ठराव हे होते. तिथे काय घडले? असे म्हणतात की मुस्लिम लीगच्या वतीने कॅबिनेट मंत्र्यांनी मुस्लिमांच्या हिताशी गद्दारी केली आणि त्यामुळे मुस्लिम संबंधात जिला तुलना नाही अशी परिस्थिती निर्माण झाली. कॅबिनेट मंत्र्याने नक्की काय केले? गेल्या 30 वर्षांपासून ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी लाडावून ठेवलेले व त्यामुळे बिघडलेले मुस्लिम लीग हे बाळ प्रथमच ब्रिटिश मजूर पक्षाने नाकारले. (सरकारी पक्षाच्या बाकांवरून मोठा गोंधळ) हे कटूसत्य ऐकल्यावर  सदस्य आपल्या भावना दाबून ठेवू शकले नाहीत.

-(बंगालम विधानसभा, 20 सप्टेंबर 1946 )

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## संविधान सभेत देशभक्तीचा आवाज



डॉक्टर मुखर्जी बंगालकडून घटना समितीवर निवडले गेले.

- बंगालमधील विनाश आणि कलकत्त्यातील भयानक हिंसेनंतर श्यामा प्रसाद मुखर्जी दिल्लीला आले.
- तिथे ते राष्ट्रीय नेते म्हणून उदयास येऊ लागले.
- घटना समितीवर बंगालमधून निवडून गेल्यावर ते पूर्व बंगालमधील हिंदूंचा एक प्रमुख आवाज बनले आणि घटनात्मक राष्ट्रीयतेचे पक्के समर्थक बनले.
- धर्माधिष्ठित विशेष अधिकारांच्या कल्पनेला त्यांनी विरोध केला तसेच समान नागरी तत्त्वाचा पुरस्कार केला व वेगळ्या मतदारसंघांना विरोध केला

सत्यमेव जयते
भारत सरकार

फाळणी भयानकता
स्मरण दिवस

# इतिहासातील सर्वात मोठे विस्थापन

इतिहासातील सर्वात मोठे स्थलांतर सत्य रस्त्यावर आणि बसेस मध्ये विखुरले महात्मा गांधी, डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्यासहित अनेक नेत्यांच्या प्रयत्नानंतरही स्थलांतर थांबवता आले नाही. ते इतिहासातील सर्वात मोठे मानवनिर्मित स्थलांतर म्हणून ओळखले जाऊ लागले . फक्त एका वर्षाच्या कालखंडात सुमारे 15 दशलक्ष लोकांनी ब्रिटिशांनी घाईगर्दीत तयार केलेल्या सीमा ओलांडल्या. लाखो लोकांना आपली वडिलोपार्जित घरे, जमिनी, शेती सोडून अनिश्चित भविष्याकडे जाण्यासाठी भाग पाडले गेले. त्यांच्या पूर्वजांनी ही घरे बांधली होती, पण आता त्यांना एका रात्रीत फक्त एक गाठोडे बांधून स्थलांतर करावे लागत होते . प्रत्येकाला एकच प्रश्न सतावत होता -काय बरोबर घ्यावे आणि काय मागे सोडावे? बैलगाडीतील माणसे ,त्यांची गाठोड्यातील स्वप्ने, अर्ध्या उघड्या पोत्यांमधून दिसणाऱ्या साडीचा पदर,खादे कौटुंबिक छायाचित्र किंवा चांगल्या काळाची आठवण म्हणून बरोबर घेतलेलं एखादे भांडे... या साऱ्या गोष्टी माणसांनी भोगलेल्या पण राजकारण्यांनी लाजलेल्या वेदनांची कहाणी सांगत होत्या.

सत्यमेव जयते

भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## अनेक पिढ्यांना स्थलांतरास भाग पाडण्यात आले : आपले ओझे खांद्यावर घेऊन









सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

## स्मृतींचे ओझे आणि आशांचे गाठोडेः





सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस






त्याकाळी पाकिस्तानची राजधानी असलेले असलेल्या कराची शहराची 46% हूनही अधिक लोकसंख्या ही हिंदू होती. फाळणीच्या वेळी अनेक हिंदूंना तिथून बाहेर हाकलले गेले .

सत्यमेव जयते

भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

फाळणीचे चटके सर्वात अधिक बसले ते महिलांना. आकडेवारी सांगते की सुमारे 55 .000 हिंदू आणि शिख महिलांचे अपहरण करण्यात आले.







सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## राष्ट्राचे दुःख वाहून नेणाऱ्या गाड्या



1947 मध्ये अनेक दशलक्ष लोकांना भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये नवीनच आखलेलल्या सीमा पार करून स्थलांतर करणे भाग पाडले गेले .यात रेल्वेगाड्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. फक्त १५ ऑगस्ट 1947 ते 8 सप्टेंबर 1947 या कालावधीत सुमारे सात लाख निर्वासितांनी रेल्वेद्वारे स्थलांतर केले. हे फक्त भौगोलिक स्थान बदलणे नव्हते तर, ते खोलवर जखमा करणारे असे मानसिक, सामाजिक आणि आत्मिक पातळीवरचे स्थलांतर होते.

सत्यमेव जयते

भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस






सत्यमेव जयते

भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

## आशेला चिकटून राहणे: गर्दीने भरलेला निर्गम



वातावरण इतकी भीतीचे होते की प्रत्येकाला फक्त एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सुरक्षित पोहोचायचे होते त्यामुळे ट्रेनमधली प्रत्येक इंच जागा वापरली गेली .काही लोकांनी ट्रेनच्या  छतावरही बसून प्रवास केला

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

## जगणे हेच एकमेव ध्येय होते



आपला जीव वाचवण्याच्या शर्यतीत कुठल्याही सोयी सुविधा नसताना कसेबसे दुसऱ्या ठिकाणी पोहोचणे हेच एकमेव ध्येय होते. हे दृश्य त्या काळजी भीती ,असुरक्षितता आणि निराशा यांचा पुरावा आहे

सत्यमेव जयते
भारत सरकार

## फाळणी भयानकता
## स्मरण दिवस

# न पाहिलेल्या हत्याकांडांचे साक्षीदार



भुताटकीच्या गाड्या निर्वासिततांना नेणाऱ्या गाड्यांवर बरेचदा हल्ले करण्यात आले ,आणि प्रवाशांचे सामूहिक हत्याकांड करण्यात आले. अशा गाड्या फक्त प्रेतांनी भरून परत आल्या. त्यांना घोष्ट ट्रेन्स किंवा भुताटकीच्या गाड्या असे म्हटले जाऊ लागले.

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

## ओव्हरलोडेड पण न डगमगता



1947 मध्ये भारताकडे 115 नागरी विमाने होती ,त्यांत 25 डाकोटा विमाने होती .ही विमानेही लोकांना हलवण्यासाठी वापरण्यात आली .त्यांनी 35 हजार लोकांना स्थलांतर करण्यात मदत केली. नंतर त्यांनी मदत सामग्री पोचवण्याच्या कामातही मोठी महत्त्वाची भूमिका केली.

सत्यमेव जयते
भारत सरकार

# फाळणी भयानकता स्मरण दिवस

## आकाशातील जीवनरेखा



स्थलांतरा च्या वेळी भारतीय वायुसेनेनेही महत्त्वाची भूमिका बजावली. सप्टेंबर 1947 मध्ये पंजाब वरून उडत जाणाऱ्या विमानाला एक धक्कादायक दृश्य दिसले- सुमारे 30 हजार लोक पायी पायी 40 किलोमीटरचे अंतर पार करीत होते .पुढे त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी काही जमाव दबा धरून बसला होता .हे पाहिल्यावर विमानांनी त्या जमावाची जागा जमिनीवरील लष्कराच्या गस्तीपथकांना कळवली आणि स्थलांतर करणाऱ्या लोकांचे प्राण वाचवले.

सत्यमेव जयते
भारत सरकार

फाळणी भयानकता
स्मरण दिवस

# उपटून टाकलेल्यांचे एकत्रीकरण



फाळणीच्या वेळी दिल्लीच्या किंग्जवे कॅम्पमध्ये सर्वात अधिक, म्हणजे तीन लाख लोकांना आश्रय देण्यात आला होता .

सत्यमेव जयते

भारत सरकार

# फाळणी भयानकता
# स्मरण दिवस

त्यांच्या अशा, त्यांची स्वप्ने, त्यांची कुटुंबे आणि
त्यांची मातृभूमी.

